


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३५९, गुरुवार ३१ ऑक्टोबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# महायुतीच्या ऐक्याला आठ दिवसांतच तडा!

■ माधवराव लामखडे पुन्हा शरद पवारांबरोबर ■ अर्ज दाखल झाल्यानंतरही नाटयमय घडामोडी सुरूच ■ बारामतीमध्ये खा. शरद पवार, खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत घरवापसी

बारामती : विशेष प्रतिनिधी

**शरद पवार यांनी उमेदवारी नाकारल्यामुळे महाविकास आघाडीतून महाआघाडीमध्ये सहभागी झालेले नगर तालुक्यातील जिल्हा परिषदेचे मा. सदस्य माधवराव लामखडे यांनी आठच दिवसांत काडीमोड करत पुन्हा घरवापसी केली. बारामतीमध्ये घडलेल्या नाटयमय घडामोडीत लामखडे यांनी पुन्हा शरद पवार गटात प्रवेश करत राणी लंके यांच्या प्रचारात सहभागी होण्याची घोषणा बारामतीमध्ये केली.**

विधानसभेची सार्वत्रीक निवडणूक जाहिर झाल्यानंतर महाविकास आघाडीची उमेदवारी कोणाला या विषयावर महिनाभर खल झाला. अखेर जागा राष्ट्रवादीकडे असल्याने खा. नीलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांना उमेदवारी जाहिर झाली. या उमेदवारीसाठी नगर तालुक्यातील मातब्बर नेते, जिल्हा परिषदेचे मा. सदस्य माधवराव लामखडे हे इच्छुक होते. लामखडे यांनी शरद पवार यांची भेट घेउन उमेदवारी हवी अशी मागणीही केली होती, मात्र पवार यांच्यासह महाविकास आघाडीने केलेल्या सर्वेक्षणानुसार राणी नीलेश लंके यांना उमेदवारी देण्याचा निर्णय जाहिर करण्यात आला होता.

शरद पवार यांचा निर्णय न रूचल्याने माधवराव लामखडे यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटामध्ये प्रवेश करत उमेदवारीची मागणी केली होती. तिथेही त्यांना उमेदवारीचा शब्द देण्यात आला होता. मात्र अजित पवार यांनीही त्यांना उमेदवारी नाकारली. लामखडे यांनी मंगळवारी स्वतःचा अपक्ष उमेदवारी अर्जही दाखल केला. मात्र जनतेचा कानोसा घेतल्यानंतर शरद पवार हेच महाराष्ट्राचे हित जोपासणार ही भावना लक्षात आल्यानंतर खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून आपण बारामती येथे खा. शरद पवार यांची भेट घेत पुन्हा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व राणी लंके यांच्या प्रचारात सक्रीय होण्याचा निर्णय जाहिर केल्याचे लामखडे म्हणाले.



## पक्ष चिन्ह नको,साथ आणि निवडणूक निधी हवा!

दोन दिवसांपूर्वी काशिनाथ दाते यांची उमेदवारी जाहिर झाली, त्यानंतर लेक नाही बापात अन् बाप नाही लेकात अशी परिस्थिती निर्माण झाली. आजही त्यांच्यात एकमत होत नाही.पक्ष चिन्ह मिळाले तरी आजही त्यांची व्दिधा मनस्थिती आहे. पक्ष चिन्ह नको मात्र साथ हवी, निधी हवा अशी मागणीही इतर काही इच्छुकांनी केल्याची माहीती असल्याचे माधवराव लामखडे म्हणाले.

## संदेश कार्ले यांना परावृत्त करू

नगर तालुक्यातून संदेश कार्ले यांचीही निवडणूक लढविण्याची इच्छा आहे. परंतू ते आमचे जवळचे नातेवाईक असल्याने आपण त्यांची शरद पवार यांच्याशी भेट घडवून त्यांना निवडणूक लढविण्यापासून परावृत्त करू. लवकरच शरद पवार यांची सभा पारनेर-नगर मतदारसंघात होणार असून सत्तेच्या माध्यतून जनतेला न्याय देण्यासाठी आम्ही आमची भूमिका जाहिर करणार असल्याचे लामखडे म्हणाले.

## धनराज पिल्ले यांच्या हस्ते उद्घाटन

लामखडे यांची भूमिका चुकीच्या पध्दतीने मांडली नगर तालुक्याचे नेते माधवराव लामखडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून शरद पवार यांच्या विचारधारेवर काम करून पक्षाचे ध्येय धोरणे घराघरात पोहचविलेली आहेत. आजच्या शरद पवार साहेबांच्या भेटीत अनेक राजकीय चर्चा झाल्या. यावेळी लामखडे यांनी पारनेर-नगर मतदारसंघातील आघाडीच्या उमेदवाराला जास्तीत जास्त मताधिक्क्याने विजयी करण्याची जबाबदारी स्विकारली आहे. मधल्या काही कालावधीत माधवराव लामखडे यांच्याविषयी समाजात समज,गैरसमज पसरविण्यात आले होते, चुकीच्या पध्दतीने त्यांची भूमिका मांडण्यात आली.

खा. नीलेश लंके

## फक्त बैठकीसाठी गेलो !

आमचे नेते शरद पवार यांची आज बारामती येथे खा. नीलेश लंके यांच्यासमवेत गोविंद बागेत भेट झाली.राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून मी त्यांच्याबरोबर काम करतो आहे, व होतोही, दोन तिन आठवडयांपूर्वी माझ्यासह काही नेते मंडळींनी अजितदादांकडे जाऊन त्यांच्या पक्षात प्रवेश केला. माझ्याकडून अनावधानाने ती गोष्ट घडली. मुंबईस जाताना अजित पवार यांच्याशी बैठक आहे असे सांगण्यात आले होते, पक्षात प्रवेश आहे असे काहीही सांगण्यात आले नव्हते.

माधवराव लामखडे
मा.सदस्य जि प नगर

## बैठक झालीच नाही, थेट गळयात पंचे घातले !

सुजितराव झावरे असतील, काशिनाथ दाते असतील, अनेक इतर नेते असतील, विजय औटी असतील, म्हणून आम्ही गेलो होतो. पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांनी फक्त बैठक आहे असे सांगून आम्हाला मुंबईला बोलविले होते. अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर पोहचल्यावर कोणतीही बैठक झाली नाही.गळयात पक्षाचे पंचे घालण्यात आले व प्रवेश झाल्याचे जाहिर करण्यात आले.

माधवराव लामखडे

## नगर तालुक्याची लेक आमदार होणार !

पक्षाच्या उमेदवार राणी लंके या नगर तालुक्यातील अरणगांव येथील कन्या आहेत. नगर - पारनेर असा भेदभाव राहण्याचे काहीच कारण नाही. तसा कोणीही बुध्दीभेद करण्याचे कारण नाही कारण नगर तालुक्याची लेक आपल्या मतदारसंघाची आमदार होणार आहे.

माधवराव लामखडे, मा. जि प सदस्या

# उंडे प्रकरण आमच्या विरूध्दचे षडयंत्र

दाते परिवाराचा खुलासा

कर्जुलेहर्या : प्रतिनिधी

**कर्जुलेहर्या येथील दीपक उंडे प्रकरणाशी दाते परिवाराचा कोणताही कोणताही सबंध नसताना, या प्रकरणी देण्यात आलेली फिर्याद आपल्याविरोधात नसताना राजकीय आणि सामाजिक उंची कमी करण्याच्या उददेशाने राजकीय हितशत्रूंमार्फत बदनामीचे शडयंत्र उघडण्यात आल्याचा खुलासा दाते परीवाराकडून करण्यात आला आहे. सोशल मीडियावर तशा पोस्ट व्हायरल झाल्या आहेत.**




या प्रकरणाशी काहीही सबंध नसतानाही मी व माझे कुटूंबिय या प्रकरणात न्यायालयीन प्रक्रियेत सामारे गेले. या प्रकरणी जिल्हा न्यायालयाने जामीन दिला होता. अटकपूर्व जामीन दिल्यानंतर पोलीसांनी या प्रकरणाची गुणदोषांवर चौकशी केली. या प्रकरणात आमच्या कुटूंबाचा कोणताही दोष नाही ही बाब प्रत्यक्ष साक्षीदार, तांत्रीक तसेच परिस्थितीजन्य पुरावा यांच्या आधारे सिध्द झालेले असल्याचे दाते परिवाराकडून प्रसारीत करण्यात आलेल्या संदेशात नमुद करण्यात आले आहे.

## उमेदवारीमुळे षडयंत्र

या प्रकरणाचा तपास पुर्ण होऊन दोषारोपपत्र जिल्हा न्यायालयात पाठविण्यात आले आहे. त्यात आमच्या कुटूंबाचे कोठेही नाव नाही. चौकशीनंतर कलम १६९ नुसार कारवाई करण्यात आलेली आहे. असे असतानाही केवळ मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळाली असल्याने जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी आमच्या कुटूंबाची बदनामी करता यावी या एकमेव उद्देशाने विरोधकांनी षडयंत्र रचून उंडे कुटूंबियांच्या भावना भडकवून देत त्यांना फुस दिली असल्याचे दाते परिवाराच्या पोस्टमध्ये नमुद करण्यात आले आहे.

## विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली

माझ्या उमेदवारीमुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याचे यावरून ध्वनीत होते. लोकसभा निवडणूकीतही या प्रकरणी माझ्याविरोधात आरोप करण्यात आले. यावरून ही बाब स्पष्ट होते की माझे राजकीय विरोधक फक्त निवडणूक आली की या प्रकरणाचा राजकीय मुद्दा तयार करत आहेत. पारनेर तालुक्यातील जनता सुज्ञ असल्याचे या पोष्टमध्ये नमुद करण्यात आले आहे.

## लाख कोशिश करो बदनाम करनेकी

पारनेर तालुक्यातील मायबाप जनतेला माझा ४० वर्षांचा राजकीय व सामाजिक प्रवास माहीती आहे. मी व माझे कुटूंब अशा घटनांमध्ये सहभागी होणार नाही असा मला विश्वास आहे. या प्रकरणाशी माझा, माझ्या कुटूंबाचा कोणताही संबंध नाही. त्यासंदर्भातील कागदपत्रेही मी सार्वजनीक केलेली आहेत. तुम लाख कोशिश करो, मुझे बदनाम करनेकी, मै जब जब बिखरा हूँ.. दुगनी रफतारसे निकला हूँ .

काशिनाथ दाते
उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस

# स्टार प्रचाराकांत नीलेश लंके दहाव्यास्थानी !

राज्यभरातून प्रचारसभेसाठी डिमांड

मुंबई : प्रतिनिधी

**येत्या २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणूकीसाठी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या स्टार प्रचारकांमध्ये नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार नीलेश लंके यांची वर्णी दहाव्या स्थानावर लागली असून त्यांच्या प्रचार सभांना राज्यभरातून मागणी आहे.**

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे पाठविलेल्या यादीमध्ये खा.नीलेश लंके हे अल्पावधीत दहाव्या स्थानावर जाऊन पोहचले आहेत. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ही यादी मंत्रालयातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे पाठविली आहे.

सन २०१९ च्या निवडणूकीमध्ये विद्यमान खा. नीलेश लंके यांनी तत्कालीन विधानसभेचे उपाध्यक्ष विजय औटी यांच्या विरोधात निवडणूक लढविली. एक सर्वसामान्य कुटूंबातील या तरूणाने ही निवडणूक तब्बल साठ हजार मतांनी जिंकत जिल्हयात तसेच राज्यात इतिहास निर्माण केला. त्याच वेळी खा. लंके हे राज्य पातळीवरील राजकारणात जायंट किलर म्हणून नावारूपास आले होते.

विधानसभेच्या निवडणूकीनंतर नाटयमय घडामोडी झाल्या. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले आणि कोरोना महामारीने जगभरात थैमान घातले.



विकास कामांवर निर्बंध आलेले असताना नीलेश लंके यांनी कोरोना बाधित रूग्ण, लॉक डाउन झाल्यामुळे घरी पायी जाणाऱ्या राज्यातील परराज्यातील नागरीकांसाठी सेवा सुरू केली. पहिल्या व दुस-या लाटेत खा. लंके यांनी स्वतःच्या जिवावर उदार होऊन केलेली कोरोना रूग्णांची सेवा राज्याला, देशाला नव्हे तर जगाला भावली. सर्व सामान्य जनतेशी नाळ जोडलेल्या नीलेश लंके यांनी लोकप्रियता शिखराला पोहचलेली असताना त्यांना आता शरद पवार पक्षाच्या स्टार प्रचाराकांच्या यादीत संधी मिळाल्याने लंके समर्थकांची कॉलर टाईट झाली आहे.

## हे आहेत स्टार प्रचारक

शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड, अनिल देशमुख, राजेश टोपे, अमोल कोल्हे, फौजिया खान, अरूण गुजराथी, नीलेश लंके, भास्कर भगरे, ॲड. जयदेव गायकवाड, बजरंग सोनवणे, धैर्यशिल मोहिते, बाळयामामा म्हात्रे, शशिकांत शिंदे, रोहित पवार, सुनील भुसारा, हरिभाऊ राठोड, प्रकाश गजभिय, नसिब सिध्दीकी, बसवराज पाटील नागरालकर, रोहित आर. पाटील, श्रीमती रोहिणी खडसे, पंडीत कांबळे, कु सक्षणा सलगर, राज राजापूरकर, सुनील गव्हाणे, उत्तम जाणकर, विकास लवांडे, श्रीमती हेमा पिंपळे, नितेश कराळे, भुषणसिंह होळकर, जावेद हबीब, हिरालाल राठोड, जयवंत वानोळे, कविता म्हेत्रे, संजय काळबांडे, यशवंत गोवासी, श्रीराम मुंडे.

# राज्यभरात थंडीची चाहूल

किमान तापमान २० अंश सेल्सिअसच्या खाली



मुंबई : प्रतिनिधी

**उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यभरात थंडीची चाहूल लागली आहे. किमान तापमान अनेक ठिकाणी २० अंश सेल्सिअसच्याही खाली गेले आहे. पहाटे हवेत गारवा जाणवत आहे. अपवादात्मक ठिकाणे वगळता कमाल तापमानही ३४ अंश सेल्सिअसच्या आत आहे. दक्षिण कोकण आणि दक्षिण- मध्य महाराष्ट्रात ढगाळ वातावरण तयार झाले आहे. तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून राज्यात थंड वारे येत आहेत. त्यामुळे कमाल आणि किमान तापमानात घट झाली आहे. मध्यरात्री आणि पहाटे हवेत गारवा जाणवत आहे. किमान तापमान राज्यात अनेक ठिकाणी २० अंश उर्वरीत पान ३ वर

## दिवाळीनंतरच थंडीला सुरुवात

दक्षिण कोकण, दक्षिण महाराष्ट्रात पुढील तीन दिवस तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यामुळे पहाटे गारवा जाणवत आहे. ढगाळ वातावरणामुळे पुन्हा तापमान वाढण्याचा अंदाज आहे. दिवाळीनंतरच थंडीला सुरुवात होण्याचा अंदाज आहे.

डॉ. एस. डी. सानप,
शास्त्रज्ञ हवामान विभाग

# पंतप्रधान मोदी, अमित शाह महाराष्ट्रात तळ ठोकणार

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यावी प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली. आता सर्वच राजकीय पक्षांनी प्रचारावर लक्ष केंद्रीत केले आहे. भाजपच्या



वतीने विधानसभा निवडणूक प्रचाराचा मेगा प्लॅन तयार केला आहे.

उर्वरीत पान ३ वर



# प्रगतीमंत्र

# एंटरटेनमेंट इंडस्ट्रीतील धडपड !

**गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या देशात एंटरटेनमेंट इंडस्ट्री अर्थात मनोरंजन क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. यातील चित्रपट, नाटक, जाहिरात, मालिका अशा विविध क्षेत्रात अनेक कलाकार आपलं नशीब आजमवण्यासाठी धडपडतात.**

### ‘ही’ कौशल्य हवी

- कोणताही कलाकार एका रात्रीत यशस्वी होत नाही. क्वचितच एखाद्या छोट्या प्रॉडक्शनमध्ये गेल्यानंतर एखादा स्टार बनतो. परंतु या क्षेत्रात येण्यासाठी ही कौशल्य विकसित केली पाहिजेत.
- वाचन क्षमता वाढवा.
- कोणतेही पात्राच्या प्रेरणा आणि भावना अस्सल आणि मनोरंजक पद्धतीने चित्रित करणे आवश्यक आहे.
- अभिनय तंत्राच्या श्रेणीची समजून घ्या.
- दिलेल्या सूचनांचे पालन करत इतरांसह काम करण्याची क्षमता ठेवा.
- भूमिकेला जिवंत करण्यासाठी पात्राचे व्यक्तिमत्व आणि परिस्थिती यांचे संशोधन करा.
- कलाकाराने एखादे वाद्य कसे वाजवायचे किंवा एखाद्या भागासाठी स्टेज फायटिंग सिक्वेन्स कसे करावे हे शिकले पाहिजे.



चित्रपटासह या क्षेत्राशी निगडित अभिनय, दिग्दर्शन, पटकथा लेखन, सिनेमॅटोग्राफी, संकलन, ध्वनी, संगीत, नृत्य दिग्दर्शन, ग्राफिक्स आदी वेगवेगळ्या विभागांमध्ये करियर करण्याच्या उत्तम संधी उपलब्ध झाल्या आहेत. यात अभिनय क्षेत्रात अनेक कलाकार अभिनेत्री आणि अभिनेता बनण्यासाठी मेहनत घेत असतात. पण ऑडिशनमध्ये अभिनयातील स्वतःच वेगळेपण दाखवत हजारो कलाकारांशी स्पर्धा करत पुढे जावे लागते. या स्पर्धेत नंबर लागला तर स्टार नाही तर एका छोट्या रोलवर समाधान मानावे लागते. त्यामुळे अभिनय हे खूप स्पर्धात्मक क्षेत्र आहे. अनेक नकार पचवत, कमी मानधनात, अवेळी केव्हाही काम करण्याची मानसिकता ठेवावी लागते. तरीही अनेकांना अभिनय क्षेत्रात अभिनेत्री किंवा अभिनेता म्हणूनचं करियर करण्याची इच्छा असते, परंतु योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने बहुतांश जण खूप धडपड करत राहतात. त्यामुळे सुरुवातीला या क्षेत्रात ऑडिशन देण्यापासून ते कॅमेऱ्यासमोर येईपर्यंत कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते, किती मानधन मिळते आणि यातून पुढे करियरच्या काय संभाव्य संधी असतात जाणून घेऊ...

## कामाच्या संधी अन् मानधन...

२६ टक्के अभिनेते स्वःनियोजित आहेत आणि १३ टक्के थिएटर कंपनीसाठी काम करतात. अनेक जण वेगवेगळ्या मोठ्या प्रोजेक्टमध्ये काम करतात. काही छोट्या असाइनमेंटवर काम करतात. पण अभिनेत्याने सतत त्यांची पुढचं काम शोधत राहिलं पाहिजे. कारण एक असाइनमेंट एक दिवस असू शकेल तर दुसरी काही महिने असू शकते. तुम्ही सातत्याने कोणत्या जाहिराती, मालिकांमध्ये दिसत राहिलात तर तुम्हाला मोठी ऑफर मिळण्याची शक्यता जास्त असते. पण केव्हाही काम करण्याची आणि प्रवासाची सवय ठेवा. मानधन घेत असलेल्या कामाव्यतिरिक्त अभिनेत्याने ऑडिशन, नेटवर्किंग आणि कौशल्ये विकसित करण्यासाठी वेळ दिला पाहिजे. अभिनेता किंवा अभिनेत्रीला करियरच्या सुरुवातीच्या टप्प्यात ४१,२५,७०० रुपये मानधन मिळण्याचा अंदाज असतो, तर करियरच्या मध्यावर ४२,०८,२१४ रुपये आणि करियरच्या एक अनुभवी टप्प्यावर तब्बल १,५८,४२,६८८ रुपयांपर्यंत मानधन मिळण्याची शक्यता असते.

## संभाव्य करियरच्या संधी




अनेकांचे अभिनेता किंवा अभिनेत्री बनण्याचे स्वप्न पूर्ण होत नाही. त्यामुळे रुपेरी पडद्यापासून दूर होत, नामांकित नाटकामध्ये भूमिका साकारण्याचे स्वप्न बाजूला ठेवले तर इतरही करियरच्या संधी शोधल्या पाहिजेत. नवोदित कलाकार कदाचित क्रूझ लाइनवर किंवा थीम पार्कमध्ये, प्रादेशिक जाहिरातींमध्ये किंवा ऐतिहासिक री-एनेक्टर म्हणून काम करू शकतात. जाणून घेऊन करियरच्या संभाव्य संधी...

- व्हॉईस ॲक्टर : जाहिराती, व्हिडिओ गेम्स, ॲनिमेटेड सीरिज किंवा फीचर फिल्म्ससाठी व्हॉइस ॲक्टर म्हणून काम करू शकता.
- दिग्दर्शक : लिहिलेली स्क्रिप्ट पडद्यावर जिवंत करण्याची जबाबदारी दिग्दर्शकाची असते. या क्षेत्रातील योग्य कौशल्य तुमच्याकडे असल्यास त्यात करियरची संधी आहे. कास्टिंग, स्क्रिप्ट सर्व गोष्टी व्यवस्थितरित्या हाताळाव्या लागतात. तसेच बजेटमध्ये सर्व गोष्टी बसवाव्या लागतात.
- निर्माता : निर्माता कोणताही चित्रपट, टेलिव्हिजन शो, जाहिराती आणि स्टेज प्रॉडक्शनमधील सर्जनशील प्रक्रियेचे व्यवस्थापन आणि देखरेख करतात. अनेकदा निर्माते नेटवर्क किंवा प्रोडक्शन कंपनीसाठी काम करतात, परंतु बरेच जण फ्रीलान्स किंवा कॉन्ट्रॅक्ट बेसवरही काम करतात. निर्मात्यावर बजेट सेट करण्यापासून ते क्रू मेंबर्स सांभाळण्याची जबाबदारी असते.
- एस्क्ट्रा : केवळ फिल्म, मालिकांमध्येच नाही तर जाहिरात, रिॲलिटी शो आणि काही मोठ्या शोमध्ये गेस्ट म्हणूनही कामाच्या संधी असतात. यातूनही वेगळी इन्कम मिळवता येते.

## कोणत्या गोष्टींची गरज ?

या क्षेत्रात इतर क्षेत्राप्रमाणे शिक्षणाची कोणतीही अट नाही, मात्र तुम्हाला या क्षेत्रात योग्य पद्धतीने करियर करायचेच असेल तर मात्र शिक्षण आवश्यक आहे. अनेक लहान मोठ्या ॲक्टिंग अकॅडमीमध्ये जाऊन अभिनयाचे शिक्षण घेऊ शकता, तर महाविद्यालयीत जीवनात थिएटर, एकांकिका करत या क्षेत्रात पाऊल ठेवता येते. मात्र तुम्हाला अभिनयाची तितकी आवड पाहिजे. मात्र एक अभिनेत्री, अभिनेता होण्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळविण्यासाठी कोणती पाऊलं टाकली पाहिजेत, हे जाणून घ्या...

- अभिनयाचे क्लासेस लावा, महाविद्यालयातील ड्रामा क्लबमध्ये सहभागी व्हा. छोट्या-मोठ्या नाटकांमध्ये सहभाग घ्या.
- बॅचलर पदवी मिळवा, एक चांगला अभिनेत्री, अभिनेता होण्यासाठी शिक्षणाची गरज नसते. पण यात जर औपचारिक शिक्षण घ्यायचे असल्यास बॅचलर डिग्री असावी लागते.
- ऑडिशन आणि कौशल्ये विकसित करा, सिलेक्शन होणार नाही असे वाटत असले तरी वेगवेगळ्या सिनेमा, नाटक, जाहिरांसाठी ऑडिशन देत रहा. यामुळे तुम्हाला एक आत्मविश्वास येईल, अनुभव मिळेल, ओळखी वाढतील.
- मास्टर्स प्रोग्रामचा विचार करा, कधी मोठ्या शो किंवा प्रोग्राममध्ये छोटा रोल करण्याची संधी मिळाली तर ती सोडू नका. याच शोमधून कधी नशीब उजळेल सांगता येत नाही.
- एक चांगला एजंट शोधा, या क्षेत्रात काम करण्यासाठी एजंटची गरजचं असते असे नाही. पण एजंटमुळे अनेक व्यावसायिक संधी मिळतात किंवा माहित नसलेल्या गोष्टी त्यांच्याकडून चांगल्याप्रकारे समजून घेता येतात.

# कल अन् क्षमता ओळखूनच ‘कम्प्युटर’ क्षेत्रात ठेवा पाऊल!

**कम्प्युटर क्षेत्रांत विविध संधी उपलब्ध आहेत. विविध क्षेत्रांसाठी आवश्यक असणाऱ्या प्रणाली विकसित करणे, त्याचे व्यवस्थापन करणे यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज आहे. दिवसेंदिवस ती वाढणार आहे हे निश्चित. मात्र, या क्षेत्रात येताना विद्यार्थ्यांनी आपली आवड, कल आणि कुवत ओळखून अभ्यासक्रम निवडणे गरजेचे आहे.**



सध्याच्या कम्प्युटर, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात सर्वांना कम्प्युटरचे ज्ञान आवश्यक आहे. अनेक पालकांना आपले पाल्य मोबाइल किंवा कम्प्युटर उत्तम हाताळतो, त्यातील गेम्स, ॲप्लिकेशन्स त्यांना येतात म्हणजे मुलाचा कल कम्प्युटरकडे आहे, असा समज करून घेतात. मात्र, खरे म्हणजे कम्प्युटर आणि त्यातील विविध प्रणाली वापरणे किंवा हाताळणे याचा अर्थ कम्प्युटर क्षेत्रांत उत्तम करिअर करता येईल, असा होत नाही. कम्प्युटर, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात कम्प्युटर वापरण्याचे व हाताळण्याचे ज्ञान सर्वांनी घेणे हे क्रमप्राप्त झाले आहे. हे ज्ञान मिळविण्यासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमकेसीएल) माध्यमातून एमएस सीआयटी हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम केल्यानंतर ॲडव्हान्स डिप्लोमाचे पर्याय खुला आहे. महाराष्ट्र सरकारने या अभ्यासक्रमांना मान्यता दिली असून, सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना तसेच नव्याने सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सक्तीचे केले आहे. एमएस सीआयटी अभ्यासक्रम केल्यास कम्प्युटरचे बेसिक ज्ञान, ऑपरेटिंग सिस्टीम, मायक्रोसॉफ्ट ऑफिसमधील एमएस वर्ड, एम एस एक्सेल, एमएस पॉवर पॉइंट आदी प्रणालींचा अभ्यास होतो. सर्चिंग, ब्राउझिंग, ई-मेल करणे यासाठी इंटरनेट कसे वापरावे, इंटरनेट कसे हाताळावे हे समजते. दहावीच्या सुट्टीत हा अभ्यासक्रम करणे सोयीचे ठरते. सरकारमान्य कम्प्युटर प्रशिक्षण केंद्रांत या अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइन घेण्यात येते. त्यानंतर परीक्षा पूर्ण केल्यावर सर्टिफिकेट मिळते. सरकारी आणि खासगी क्षेत्रांत नोकरी करताना हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाते.

### बारावीनंतरच्या संधी

- विज्ञान शाखेतून बारावी केल्यास विद्यार्थ्यांना बीई कम्प्युटर इंजिनीअरिंग, बीई इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, बीएस्सी कम्प्युटर सायन्स, बीएस्सी ॲनिमेशन, बीसीए सायन्स असे पर्याय उपलब्ध आहेत.
- प्रवेशासाठी महत्त्वाचे - कम्प्युटर सायन्स आणि गणित या विषयांचा जवळचा संबंध आहे. पाल्याची ॲनालॅटिकल ॲबिलिटी, लॉजिकल रिझनिंग यातील गती लक्षात घेऊन अभ्यासक्रम निवडावा.
- बीएस्सी ॲनिमेशन : यामध्ये विद्यार्थ्यांना जाहिरात, मोबाइल गेम्स, ॲप्स ई-लर्निंग या क्षेत्रांत संधी आहेत.
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.
- इंजिनीअरिंगचे शुल्क महाविद्यालयानुसार ठरते. हे शुल्क सरकारची शुल्क निर्धारण समिती ठरवते.

### दहावीनंतर कम्प्युटर क्षेत्रांतील करिअरचे पर्याय...

- डिप्लोमा इन कम्प्युटर इंजिनीअरिंग किंवा डिप्लोमा इन इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी
- कालावधी : तीन वर्षे.
- प्रवेश प्रक्रिया : डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशनतर्फे (डीटीई) केंद्रीय पद्धतीद्वारे.
- प्रवेशासाठी महत्त्वाचे : दहावीत ७० टक्के किंवा अधिक गुण असल्यास चांगल्या कॉलेजात प्रवेश मिळू शकतो. डिप्लोमा झाल्यावर बीई अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. मात्र, ही प्रवेशसंख्या बीईच्या प्रथम वर्षाच्या निकालावरून ठरते. त्यामुळे काही वेळेला डिप्लोमाला चांगले मार्क मिळूनही पसंतीचे किंवा आवडीचे कॉलेज मिळेलच असे नाही. अशा वेळी काही विद्यार्थी पुन्हा प्रथम वर्ष बीईला प्रवेश घेतात. त्यात एक वर्षाचा कालावधी वाया जातो. डिप्लोमा केल्यानंतर बीएस्सी कम्प्युटर, बीसीए हा पर्यायही उपलब्ध आहे.

### कॉमर्सच्या विद्यार्थ्यांसाठी कम्प्युटरमधील करिअर

- बीबीए (कम्प्युटर ॲप्लिकेशन) : कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना कम्प्युटरमध्ये करिअर करण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे.
- एमसीए अभ्यासक्रम तीन वर्षांचा आहे.

### उच्चशिक्षण

बीई कम्प्युटर किंवा आयटी केल्यानंतर एमई, एमएस, एमएस्सी कम्प्युटर हे पर्याय आहेत. शिवाय एमबीए (सिस्टीम्स) करता येते. या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा आहे. सर्व अभ्यासक्रमांमध्ये पदव्युत्तर शिक्षण उपलब्ध आहेत. संशोधनात रस असणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. करून संशोधनक्षेत्रात जाण्याचा पर्यायही खुला आहे.



# शिक्षण आणि नोकरी एकत्र करताना...

**नोकरी सोबतच तुम्ही कोणत्याही स्पर्धा परीक्षेची किंवा इतर कोणत्याही परीक्षेची तयारी करत असाल तर त्याची तयारी नीट आणि पूर्ण मेहनत घेऊन करावी लागते. पण नोकरीसोबतच अभ्यास सांभाळणे तुमच्यासाठी खूप अवघड होऊन बसते. या लेखात तुम्हाला अशाच काही टिप्स दिल्या आहेत. जेणेकरून नोकरीसोबतच तुम्हाला अभ्यासही सहज करता येईल.**

अनेक विद्यार्थी स्वावलंबी जीवन जगण्यासाठी अभ्यासासोबत नोकरी देखील करतात. काहींना आर्थिक परिस्थितीमुळे नोकरी करणे अनिवार्य असते, तर काहीजण नोकरीसोबत स्पर्धा परीक्षांची तयारी देखील करित असतात. अशा विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी काही टिप्स फॉलो करणे आवश्यक असते.



### मन सकारात्मक ठेवा

अभ्यास करताना तुमचे संपूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले पाहिजे. असे केल्याने तुमच्या मनात आत्मविश्वासही टिकून राहतो. यासोबतच तुमच्या मनात फक्त सकारात्मक विचार ठेवा. जर तुम्ही जास्त नकारात्मक विचार केलात तर तुमच्या अभ्यासाचाही त्यामुळे खूप त्रास होतो. यासाठी सकारात्मक विचारांनीच अभ्यास करावा.

### ऑनलाइन कोचिंग

कामानंतर संध्याकाळी तुम्ही ऑनलाइन कोचिंग करू शकता. याच्या मदतीने तुमच्याकडे नोट्सही असतील आणि तुम्ही ठरलेल्या वेळेत अभ्यास करू शकाल. याशिवाय वरिष्ठांच्या मदतीने तुम्ही तुमचा अभ्यासही करू शकता. तुम्ही तुमच्या वरिष्ठांकडून मार्गदर्शन देखील घेऊ शकता जेणेकरून तुम्हाला अभ्यास करणे सोपे जाईल.

### वेळापत्रक तयार करा

लहानपणी जसे तुम्ही शाळेचे टाइम टेबल बनवले असेल त्याचप्रमाणे तुम्ही तुमचा आताचा वेळ विभागला पाहिजे. तरच तुम्ही तुमच्या अभ्यासाला वेळ देऊ शकता. यासाठी दिवसभरातील काही तास अभ्यासासाठी काढावे लागतील. असे केल्याने दिवसभरात तुमचा किती वेळ शिल्लक आहे, ज्याचा तुम्ही अभ्यासासाठी उपयोग करू शकता, हे तुमच्या लक्षात येईल. तसेच या वेळापत्रकात तुम्ही कठीण विषयांसाठी वेळ बाजूला ठेवू शकता.

### परीक्षेचा पॅटर्न समजून घ्या

तुम्ही कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेचा अभ्यास करत असाल तर त्यासाठी परीक्षेची तयारी करण्यापूर्वी तुम्हाला त्याची परीक्षा पद्धत समजून घ्यावी लागेल. तसेच, नोकरीसोबत काही तास काढून सुमारे चार ते पाच तास मन लावून तयारी करावी लागेल. जर तुम्ही एखाद्या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी अभ्यास करत असाल तर त्यासाठीही तुम्ही वेळापत्रक बनवा आणि अभ्यासाला सुरुवात करा.



## शॉर्ट न्यूज

### आ. गडाखांचे शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल

**नेवासा :** विधानसभा मतदार संघात शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार आ. शंकरराव गडाख यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी नेवासा शहरात मोठे शक्ती प्रदर्शन केले आहे. नेवासा शहरातील सदाशिवनगर येथील मंगल कार्यालयापासून फटाक्याची आतिषबाजी करत आ. शंकरराव गडाख यांचा विजय असो आश्या घोषणा देत रॅलीला प्रारंभ करण्यात आला. यानिघालेल्या रॅलीमध्ये नेवासा तालुक्यातील हजारो कार्यकर्ते सहभागी झाले होते. तर श्रीरामपूर रस्त्यावर सदरची रॅली निघाली. शहरात नेवास्कारांच्या वतीने फटाक्याची आतिशीबाजी करत आ. शंकरराव गडाख यांचे स्वागत केले.

### पाथर्डी पोलिसांची विधानसभा निवडणुकीसाठी मोठी कारवाई

**पाथर्डी :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाथर्डी पोलिसांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत पार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कारवाया सुरू केल्या आहेत. १६ ऑक्टोबरपासून लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेनंतर पोलिसांनी गुन्हेगार पार्श्वभूमीच्या चारशे व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाया केल्या आहेत. तसेच, अवैध दारू विक्री करणाऱ्या २७ ठिकाणांवर कारवाई करून २ लाख १७ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामुळे निवडणुकीच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मदत होणार आहे.

### नाट्यमय घडामोडीनंतर विखेंची माघार

**संगमनेर :** लोकसभेच्या निकालानंतर संगमनेरातील राजकीय आणि सामाजिक वातावरण फारच टाईट झाले होते. खऱ्या अर्थाने. मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी संगमनेरचा माहोल बदलुन टाकला होता. मात्र, रोखठोक सार्वभौमचे ठाम मत होते. की, ते वातावरण तयार करणार आणि अमोल खताळ यांच्या पाठीशी साम, दाम, दंड, भेद अशा पद्धतीने उभे राहून बळ देणार. अर्थात संगमनेरात स्वतः डॉ. विखे यांनी भर सभेत सांगितले. की, यापुर्वीचे थोरात विरोधक केवळ मॅनेज आणि पाकीटवाले होते. मात्र, अमोल खताळ हे संगमनेर तालुक्यातील कट्टर विरोधक म्हणून नावारुपाला आलेले आहे.

### राहुरीत ११ इच्छुकांनी केले १२ उमेदवारी अर्ज दाखल

**राहुरी :** राहुरी- नगर-पाथर्डी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी काल दि. २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत ११ इच्छुकांनी १२ उमेदवारी अर्ज दाखल केले. तर १२ इच्छुकांनी १४ उमेदवारी अर्ज नेले असून १७ उमेदवारांनी १९ अर्जदाखल केले आहेत तर ७२ व्यक्तींनी १०५ अर्ज नेले. काल सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी अल्ताफ इब्राहिम शेख, डॉ. जालिंदर घिगे, साहेबराव पाटीलचा म्हसे, सोहम बापूसाहेब चिघे, अनिल भिकाजी जाधवअशी माहिती २२३ राहुरी विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय आधिकारी शाहूराज मोरे यांनी दिली.

### श्रीगोंद्यात राहुल जगतापांचा सांगली पॅटर्न

**श्रीगोंदा :** लोकसभा निवडणुकीत सांगली पॅटर्न गाजला, त्याचीच पुनरावृत्ती श्रीगोंदा - नगर विधानसभा मतदार संघात पाहायला मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्राबल्य असलेल्या या मतदार संघात शिवसेना ठाकरे गटाने अनुराधा नागवडे यांना पक्षात प्रवेश देवून उमेदवारीही जाहीर केली. त्यामुळे शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल जगताप यांनी बंडखोरी करत आज मंगळवारी (दि. २९) अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. मात्र यावेळी त्यांनी केलेले शक्ती प्रदर्शन महायुती अन महाआघाडीला धडकी भरवणारं ठरलं आहे.

# हसुन जिरविण्याचेच काम संगमनेरच्या नेत्याने केले

## पालकमंत्री विखेंचा बाळासाहेब थोरातांना टोला

**राहाता : प्रतिनिधी**

**ठेकेदार आणि माफीयांच्या जीवावर राजकारण करण्यासाठी काही लोकं आपल्या भागात येत आहेत. परंतू या भागातील जनता त्यांना थारा देणार नाही. त्यांच्या तालुक्यातच त्यांची निष्क्रीयता उघड झाली आहे. केवळ हसून दुसऱ्याची जिरविणे एवढेच काम संगमनेरच्या नेत्यांनी आजपर्यंत केले असल्याचा टोला महसूल तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला.**



महायुतीच्या वतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करुन, मंत्री विखे पाटील यांनी विजय संकल्प मेळाव्यातून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांशी संवाद साधला. जेष्ठनेते आण्णासाहेब म्हस्के पाटील, आ.आशुतोष काळे, डॉ.सुजय विखे पाटील, सौ. शालिनीताई विखे पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, शिवसेनेचे सागर बोठे, भाजपाचे तालुका अध्यक्ष दिपक रोहोम, ओबीसी आघाडीचे बाळासाहेब गाडेकर, मुस्लिम समाजाचे जेष्ठनेते रऊफ मौलाना, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, मुकूंदराव सदाफळ आदी याप्रसंगी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, महायुती सरकारच्या माध्यमातून या मतदार संघातील खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवून शेतकऱ्यांना न्याय देता आला. निळवंडे कालव्याचे पाणी दिलेल्या शब्दाप्रमाणे आणून दाखविले. तरुणांच्या रोजगारासाठी औद्योगिक वसाहतीची उभारणी सुरु झाली. आपल्या सर्वांच्या आशिर्वादाने ही लोकहिताची कामे करता आली. केवळ आपला मतदार संघच नाही तर जिल्ह्याच्या नामांतरा बरोबरच नेवासे येथील ज्ञानेश्वर सृष्टी ,अहिल्यादेवींचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा महत्वपूर्ण घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

एक रुपयात पीक विमा योजनेचा मोठा लाभ शेतकऱ्यांना मिळाला आहे. मोफत वीज देण्याचा निर्णयही घेतला आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला मिळालेल्या प्रतिसादामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांना धडकी भरली आहे. योजना बंद पाडण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते न्यायालयात गेले. आता मतं माघायला दारात येतील तेव्हा त्यांना जाब विचारा असे आवाहन करुन, महाविकास आघाडीकडे सांगायला काही राहीलेले नाही. फक्त कोन बनेगा करोडपती याची स्पर्धा सुरु असल्याची टिका त्यांनी केली.

### आमच्याकडे दशहत असती तर

**संगमनेर साखर कारखान्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ यांच्या भावाला पंचायत समितीच्या इमारतीचे काम आम्ही करु दिले असते का? उद्योपती मालपाणींना शिर्डीमध्ये साईतिर्थ पार्क उभा करावसा वाटला असता का? तुमचे भाऊ इंद्रजित थोरात यांनी राहाता तालुक्यात कोणालाही कमीशन न देता २० कोटी रुपयांचे कामे केली आहेत, मग त्यांना कोणती दहशत वाटली. तुमच्या तालुक्यातील लोकांचे प्रपंच आमच्या तालुक्यातुन सुरु आहेत याचा मलाही आनंद वाटतो.**

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शिर्डीत येवून केलेल्या आरोपांना उत्तर देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, तुम्ही आमच्याकडे येवून काही बोलायचे, ती तुमच्यासाठी लोकशाही असते, आम्ही थोडी टिका केली तर, लगेच लोकशाही धोक्यात असल्याचा आरोप करता, लोकशाही कुठेही धोक्यात नाही, तुमचे पद धोक्यात आले आहे. त्यामुळेच थोड्याशा आरोपांमुळे तुम्ही अस्वस्थ झाला आहात. वाळु माफिया आणि एंजटांना पुढे करुन, डॉ. सुजय विखे पाटील यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचल्याच्या आरोपाचा पुनरुच्चार करुन, वसंतराव देशमुख यांच्या वक्तव्याचे आम्ही कधीही समर्थन केले नाही. उलट त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. पण ज्या निष्पाप महिलांना झाली, त्यांची माफी मागण्याचीही तुमची दानत नाही.

टोळ्या आणि माफीयांच्या जीवावर राजकारण करुन, आम्ही कशी दहशत निर्माण करु शकतो हा संगमनेरच्या नेत्यांचा चेहरा आता राज्याला दिसला आहे. राहाता तालुक्यातील जनता ही खोट्या भूलथापांना बळी पडणार नाही. गणेश कारखाना चालवायला घेतला म्हणून तो शेतकऱ्यांच्या मालकीचा राहीला. यापुर्वीच तुम्ही घ्यायला पाहीजे होता. संस्थावर चर्चा करायची असेल तर एकदा समोरासमोर याच असे आवाहन देवून समन्वयाची पाणी वाटप कायद्याचे भूत तुम्ही जिल्ह्याच्या मानगुटीवर बसविले त्याची किंमत मोजावी लागली. महायुती सरकारने आता पश्चिम वाहीणी नद्यांचे पाणी पुर्वेकडे वळविण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे.

विधानसभेची निवडणूक ही तुमच्या सर्वांची आहे, मताधिक्य देण्याचे काम तुमचे आहे. गावात आणि बुथवर चांगल्या पध्दतीने काम करा असे अवाहन करुन, विकासाच्या प्रक्रीयेत आणि आपल्या अन्नात माती कालविणाऱ्यांना थारा देवू नका असे आवाहन त्यांनी केले. डॉ.सुजय विखे पाटील यांनी आपल्या आक्रमक भाषणात सांगितले की, मी चार सभा घेतल्या तर त्यांचे सिंहासन हालले, ही तर सुरुवात आहे. आता इकडे येवून तुम्ही काय करणार. ज्यांच्यासाठी येत आहात त्यांच्याकडून काही होणार नाही हे या तालुक्यातील जनतेला माहीत आहे. मात्र आमच्या तालुक्यात येवून खालच्या पातळीवर जावून बोललात तर आम्ही आता कायद्याच्या सर्व चौकटी सोडून उत्तर देवू. आमच्या सहनशिलतेला कमजोरी समजू नका असा इशाराही त्यांनी दिला. काल महाविकास आघाडीच्या सभा झाली. या सभेमध्ये हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा फोटोही बॅनवर टाकायची आठवण राहीली नाही. आता तरी जागे व्हा आणि उध्दव बाळासाहेब ठाकरे गटातील सैनिकांनो योग्य निर्णय घ्या असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी आण्णासाहेब म्हस्के पाटील, आ.आशुतोष काळे, मौलाना रऊफ, सुरेंद्र थोरात यांचीही भाषण झाली. सभेपुर्वी राहाता शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मंत्री विखे पाटीलही दुचाकीवर बसून सहभागी झाले होते. व्यासपीठावर येताच लाडक्या बहीणींनी मंत्री विखे पाटील यांचे राख्या बांधून त्यांचे स्वागत केले.

# श्रीगोंदा तालुक्यात रस्तालूट करणारी टोळी जेरबंद

## चार लाख ४२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदा तालुक्यात रस्तालूट करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. त्यांच्याकडून चार लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल पथकाने हस्तगत केला.**



पथकाने टोळीतील किरण उत्तम लोंढे (वय २२, रा. महालक्ष्मी चौक, काष्टी, ता. श्रीगोंदा), ओम शांतराम धोत्रे (वय २४, रा. दत्तनगर, काष्टी, ता. श्रीगोंदा), रोहित साहेबराव शिंदे (वय २०, रा. बजरंगनगर, काष्टी, ता. श्रीगोंदा), किरण लक्ष्मण गायकवाड (वय २१, रा. बजरंगनगर, काष्टी, ता. श्रीगोंदा), सुनील शिवाजी लोणारे (वय २१, रा. कायनेटिक चौक, केडगाव, अहिल्यानगर), राहुल उत्तम काळे (वय १९, रा. भिंगार, अहिल्यानगर), निखील अश्विन घोरपडे (वय २०, माधवबाग, भिंगार, अहिल्यानगर) व अक्षय अण्णासाहेब कोबरणे (वय २५, रा. दूधसागर सोसायटी, केडगाव, अहिल्यानगर) यांना ताब्यात घेतले आहे. त्यांचे दोन साथीदार अल्ताफ नूरमोहंमद आतार (रा. भैरवनाथ चौक, काष्टी, ता. श्रीगोंदा) व योगेश रमेश शिंदे हे पसार आहेत. त्यांचा शोध पथक घेत आहे.

दौंड (जि. पुणे) येथील किराणा मालाचे व्यापारी अभय मांडोत हे श्रीगोंदा तालुक्यात किराणा मालाचा टॅम्पो घेऊन माल विकत असतात. मांडोत यांचा टॅम्पो गुरुवारी (ता. २४) टाकळी लोणार (ता. श्रीगोंदा) येथे आला होता. त्यावेळी टॅम्पो अडवत काही व्यक्तींनी त्यांना गावठी पिस्तुलीचा धाक दाखवत त्यांच्या जवळील तीन लाख ६० हजार रुपये बळजबरीने हिसकावून नेले. या संदर्भात त्यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. श्रीगोंदा पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल करून घेतला होता.

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या घटनेचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवला होता. त्यानुसार पथकाने घटनास्थळाला भेट देत तांत्रिक पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली. त्यावेळी पथकाला माहिती मिळाली की, हा गुन्हा किरण लोंढे व त्याच्या साथीदारांनी केला आहे. तो काष्टीवरून अहिल्यानगरला साथीदारांसह दुचाकीवरून निघाला आहेत. त्यानुसार पथकाने पारगाव फाटा येथे सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील दोन लाख रुपये रोख, गावठी पिस्तुल व तीन दुचाकी असा चार लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल पथकाने आरोपींकडून हस्तगत केला आहे. पथकाने पुढील तपासासाठी आरोपींना श्रीगोंदा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# श्रीरामपूर पोलिसांना मटका व दारू बाटली भोवली

## लाच घेताना तीन पोलिसांनाच 'एसीबी'ने पकडले

**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**मटक्याच्या व्यवसायावर कारवाई न करता मटक्याचा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना तसेच २ हजार ६० रुपये किंमतीची एक दारूची बाटली घेताना श्रीरामपूर शहर पोलिस स्टेशनच्या तीन पोलिसांना नगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. पोलिस नाईक रघुवीर ओंकार कारखिले, पोलिस कॉन्स्टेबल राहुल महादेव नरवडे, पोलिस कॉन्स्टेबल गौतम शंकर लगड, सर्व श्रीरामपूर पोलिस स्टेशन अशी लाचखोर पोलिसांची नावे आहेत.**




श्रीरामपूर येथे मटक्याचा व्यवसाय आहे. तक्रारदाराच्या मटक्याच्या व्यवसायावर कारवाई न करता मटक्याचा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी पोलिस नाईक रघुवीर ओंकार कारखिले यांनी तक्रारदाराकडे ६ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. याबाबची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती. दरम्यान, मटक्याच्या व्यवसायावर कारवाई न करता व्यवसाय चालू ठेवण्यासाठी पोलिस नाईक रघुवीर कारखिले यांनी तक्रारदाराकडे ६ हजार रुपये लाचेची मागणी केली. तडजोडीअंती ५ हजार रुपये लाच घेण्याचे मान्य केले. त्यानंतर कारखिले यांनी तक्रारदार नको म्हणत असताना त्यांना त्यांच्या मटक्याच्या अड्ड्यावर घेऊन जात तक्रारदाराकडून चार हजारांची रुपयांची लाच स्वीकारली. उर्वरित १ हजार रुपये व दारूच्या बाटलीची मागणी केली. पोलिस कॉन्स्टेबल राहुल महादेव नरवडे यांनी तक्रारदाराच्या मटक्याचे व्यवसायावर कारवाई न करण्यासाठी २ हजार ६०० रुपये किंमतीची दारूच्या बाटलीची मागणी करून ती स्वीकारण्याची तयारी दर्शवली.

पोलिस कॉन्स्टेबल राहुल नरवडे यांनी मागणी केलेली दारूची बाटली आणण्यासाठी पोलिस कॉन्स्टेबल गौतम शंकर लगड यांनी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिले हे स्पष्ट सिद्ध झाले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली.

(पान १ वरून)

## राज्यभरात थंडीची चाहूल

सेल्सिअसच्याही खाली गेले आहे. तर कमाल तापमान अपवादात्मक ठिकाणे वगळता ३४ अंश सेल्सिअसच्या खाली आहे. मागील दोन दिवसांपासून नाशिक, नगरसह उत्तर महाराष्ट्रात १८ अंश सेल्सिअसपर्यंत पारा आला आहे. मंगळवारी (२९ ऑक्टोबर) महाबळेश्वर येथे १५.४ अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे.

उत्तरेकडून येणारे थंड वारे आणि हवेतील बाष्प आणि पहाटे कमी होणाऱ्या तापमानामुळे राजाच्या बहुतेक भागात दाट धुके पडत आहे. अनेक ठिकाणी सकाळी आठ वाजेपर्यंत धुके पहावयास मिळत आहे. पुढील काही दिवस धुके कायम राहण्याचा अंदाज आहे.

राज्यात उत्तर भारतातून काही प्रमाणात थंड वारे येत आहेत. तर, ईशान्य वारे राज्यावर येताना बंगालच्या उपसागरातून बाष्प सोबत आणत आहेत. या दोन्ही वाऱ्यांचा मिलाफ दक्षिण महाराष्ट्रावर होत आहे. त्यामुळे राज्याच्या काही भागात ढगाळ वातावरण तयार झाले आहे. पुढील तीन चार दिवस दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रासह मराठवाडा आणि विदर्भातील तुरळक ठिकाणी ढगाळ वातावरण राहील. या भागात विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

## पंतप्रधान मोदी, अमित शाह महाराष्ट्रात तळ ठोकणार

भाजपच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह बडे नेते प्रचाराच्या रणधुमाळीत उतरणार आहेत. मोदी यांच्याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील अनेक जाहीर सभांना संबोधित करणार आहेत.

भारतीय जनता पार्टीच्या सुत्रांनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबई-कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रात एकूण ८ सभा घेणार आहेत. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि भापजचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही जास्तीत जास्त सभा घेण्याची जबाबदारी असणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भाजपकडून विधासनभा निवडणुकीच्या प्रचारासाठी १०० हून अधिक सभांचे नियोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी एकूण ८ प्रचार सभा घेणार असून गृहमंत्री अमित शाह २० सभांना संबोधित करणार आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या ४० सभा होणार आहेत. तर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सर्वाधिक ५० प्रचार सभा घेणार आहेत. भाजप प्रदेशाध्यक्ष ४० तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ १५ सभांना संबोधित करणार आहेत. दरम्यान, या सभा राज्यातील महत्त्वाच्या मतदारसंघांत होणार आहेत. या सभांची तारीख अद्याप समोर आलेली नाही. मात्र, दिवाळीनंतर भाजपकडून प्रचाराचा नारळ फोडला जाणार असल्याची चर्चा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ७ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर महाराष्ट्रात तळ ठोकून असणार आहेत. या ८ दिवसांत ते विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतील. पंतप्रधान मोदी १४ नोव्हेंबरपासून परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे प्रचारासाठी फारसा वेळ नसणार. त्यामुळे या ८ दिवसांत मोदींच्या जास्तीत जास्त सभा घेण्यावर महायुती भर देईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ भाजपच नाही तर महायुतीच्या घटक पक्षातील उमेदावारांच्या प्रचारासाठी सुद्धा सभा घेणार आहेत.

विधानसभा निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी १८ नोव्हेंबर पर्यंत वेळ दिल आहे. त्यामुळे राज्यभरात मोठमोठ्या नेत्यांच्या जाहीर सभांचा धडाका राहणार आहे. विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी असा थेट सामना होणार आहे. दोघांकडूनही मोर्चेबांधणी करण्यात येत असून स्टार प्रचारकांच्या सभांकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदार होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे.

# कर्जुले गणातील बैठकीने दाते यांच्या प्रचारास प्रारंभ

## गणातून उच्चांकी मताधिक्क्य देण्याचा निर्धार

**सावरगांव : प्रतिनिधी**

**महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचारार्थ कर्जुलेहर्या गणातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बुधवारी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सावरगांव येथे पार पडली. दाते यांना कर्जुलेहर्या गणातून उच्चांकी मताधिक्य देण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी केला.**



महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी मंगळवारी शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रचाराचे नियोजन सुरू केले आहे. पारनेर-नगर मतदारसंघात परिवर्तन करण्यासाठी एकदिलाने काम करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

बैठकीस भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाबासाहेब खिलारी यांनी प्रत्येक गावात बुथनिहाय प्रचाराचे नियोजन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना विश्वनाथ कोरडे यांनी सांगितले की, केंद्रात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार असून राज्यातही त्याच विचाराचे सरकार हवे असा निर्धार जनतेने केला आहे. लाडकी बहिण योजना राज्यातील बहिणींना भावली असून त्यांनी महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतलेला आहे. लोकसभा निवडणूकीत आपण गाफील राहिलो त्याचा फटका महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांना बसला. यावेळी मात्र प्रत्येक कार्यकत्याने सजग राहून बुथ कमिटयांवर लक्ष केंद्रीत करून प्रत्येक बुथवर आपल्या उमेदवारला कशी आघाडी मिळेल याची काळजी घेण्याच्या सुचना कोरडे यांनी यावेळी दिल्या.

कोरडे म्हणाले, लोकसभा निवडणूकीमध्ये कांद्याच्या दराचा प्रश्न होता, विरोधकांकडून संविधानाचा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. महायुतीविरोधात अपप्रचार करण्यात विरोधकांना यश आले होते. आज मात्र ती स्थिती नाही. कांद्याला चांगले बाजार भाव मिळत आहेत. राज्यातील महाविकास आघाडीच्या सरकारने अलिकडच्या काळात घेतलेले निर्णय मतदारांना भावले असून यावेळी मतदार महायुतीच्या पाठीशी आहेत. कार्यकर्त्यांनी महायुती सरकारने घेतलेले निर्णय मतदारांपर्यत पोहचवावेत असे आवाहन कोरडे यांनी केले.

# कोरोना महामारीत जगताप यांनी नागरीकांना आधार दिला

■ ज्येष्ठ कर सल्लागार अशोक पितळे यांचे प्रतिपादन ■ अहिल्यानगर सीए शाखेचा जगताप यांना पाठींबा



**नगर : प्रतिनिधी**

**कोरोना महामारीने संपूर्ण जगाला संकटात टाकलेले असताना नगर शहराचे लोकप्रतिनिधी या नात्याने आ. संग्राम जगताप यांनी शहरातील नागरीकांना आधार देत आपले कर्तव्य चोख बजावल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ कर सल्लागार अशोक पितळे यांनी केले.**

नगर शहर विधानसभा निवडणूकीतील महायुतीचे उमेदवार आ. संग्राम जगताप यांना अहिल्यानगर सीए शाखेच्या वतीने पाठींबा देण्यात आला. यावेळी अशोक पितळे हे बोलत होते. यावेळी सी ए शाखेचे अध्यक्ष सनित मुथा, सचिव अभय कटारिया, खजिनदार महेश तिवारी, मा अध्यक्ष मोहन बरमेचा,मिलिंद जांगडा, पवन दरेकर, सुशील जैन, किरण भंडारी आदींसह सीए शाखेचे सर्व सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना पितळे म्हणाले, आ. संग्राम जगताप हे प्रथम आमदार झाले त्यावेळी त्यांना सभागहात विरोधी बाकावर बसावे लागले. दुसऱ्यांदा निवडणूक जिंकून विधिमंडळात गेल्यानंतर मात्र सत्ताधारी पक्षाच्या माध्यमातून त्यांनी विकास कामांना गती दिली. सरकार स्थापनेनंतर कोरोना महामारीचे संकट आले. कोरोना महामारीत मोठा कालखंड गेल्यानंतर अत्यंत कमी कालावधीत सरकारकडे सतत पाठपुरावा करून हजारो कोटींचा निधी त्यांनी नगर शहरासाठी उपलब्ध करून दिला. मोठया प्रमाणावर विकास निधी मंजुर झाल्याने आपले नगर शहर विकासाच्या दिशेने घोडदौड सुरू असल्याचे महाराष्ट्र खो-खो संघटनेचे उपाध्यक्ष अशोक पितळे यांनी सांगितले.

### विकास कामांच्या जोरावर निवडणूकीच्या रिंगणात

गेल्या दहा वर्षात केलेल्या विकास कामांच्या जोरावर या निवडणूकीस मी सामोरे जात आहे. शहराला पुढे कोण नेणार हे महत्वाचे आहे. शहरातील स्वतंत्र क्रिडा संकुलासाठी १५ कोटींचा स्वतंत्र आराखडा तयार केल्यानंतर त्यास मान्यता मिळाल्यानंतर १५ ते २० कोटींचा निधी मंजुर करण्यात आला असल्याचे जगताप म्हणाले.

### एमआयडीसीमध्ये विरोधकांनी खोडा घातला

सुपा एमआयडीसीच्या बरोबरीने नगरच्या एमआयडीसीला मान्यता मिळणे शक्य होते, मात्र विरोधकांनी त्यात खोडा घालण्याचे काम केले. सर्वांच्या सहकार्यामुळे विळद घाटात एमआयडीसीसाठी ६०० एकर जमीन उपलब्ध करण्यात आली असून पुढच्या टप्प्यात एमआयडीसीच्या उभारणीस सुरूवात होईल. या वसाहतीमध्ये मजुरांपासून सर्वांच्याच हाताला काम मिळणार आहे.

आ. संग्राम जगताप

### विकासासाठी संग्रामभैय्यांची हॅट्रीक हवी

गेल्या बारा, तेरा महिन्यात आ. जगताप यांनी अनेक प्रकल्प पुर्णत्वास नेले. शहराचे वैभव असलेल्या क्रिडा संकुलासाठी त्यांनी १५ ते २० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. बुरूडगाव येथे अद्यावत रूग्णालयाची निमती केली. विळद घाटात अद्यावत औद्योगिक वसाहतीसाठी सहाशे एकर जागा उपलब्ध करण्यात आली असून त्या माध्यमातून मोठे उद्योग उभे राहणार आहेत. शहराच्या विकासाला विकासाला गती मिळणार आहे. शहराच्या विकासाची घोडदौड अशीच सुरू ठेवण्यासाठी आ. जगताप यांच्या विजयाची हॅट्रीक आपणा सर्वांना पहावयाची आहे. त्यांना भरघोस मतांनी विधासभेत तिसऱ्यांदा पाठवावे.

अशोक पितळे
ज्येष्ठ कर सल्लागार
उपाध्यक्ष, महाराष्ट्र खो-खो संघटना

### शहर विकासाचा अजेंडा महत्वाचा

शहरासाठी मी २४ तास काम केले. मला शहराविषयी अस्था होती, आपुलकी होती म्हणून शहराचा विकास झाला. जिथे विकास असतो तिथेच लोक वस्ती वाढते ही आपल्या शहराची ओळख आहे. राज्य सरकारकडून क्रिडा संकुलास मंजुरी मिळविली व १२ ते १३ कोटींच्या निधीचीही तरतुद करण्यात आली. निवडणूक नव्हे तर शहराच्या विकासाचा अजेंडा महत्वाचा आहे.

आ. संग्राम जगताप

### मायक्रो व्हिजन असलेले आमदार

आ. जगताप यांनी आमदारकीच्या माध्यमातून शहराला नवी दिशा देण्याचे काम केले. विकासाची नवी दिशा त्यांनी शहराला दिली. ते मायक्रो व्हिजन असलेले आमदार आहेत. शहराचा सर्वांगिण विकास त्यांनी केला. त्यांना तिसऱ्यांदा निवडून देण्यासाठी सीए शाखा त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून सर्वांचा त्यांना पाठींबा आहे.

सनित मुथा
चार्टर्ड अकाउंटंट

---

# वैभव डेअरीचे दुध उत्पादकांसाठीचे उपक्रम कौतुकास्पद

हवामान तज्ञ पंजाबराव डख यांचे प्रतिपादन



**भाळवणी : प्रतिपादन**

**दुग्धव्यवसायातील केंद्रबिंदू म्हणजे दुध उत्पादक शेतकरी,भाळवणी येथील वैभव दुध संकलन केंद्र दरवर्षी प्रमाणे दीपावली निमित्त दुध उत्पादकांना बोनस,विविध विषयातील जाणकार वक्त्यांचे मार्गदर्शन व कष्टकरी उत्पादक शेतकऱ्यांचा आणि त्यांना या कामात साथ देणाऱ्या सहचरिणी यांचा सत्कार सोहळा आयोजित करते,ही बाब निश्चितच प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाबराव डख यांनी केले.**

भाळवणी ता.पारनेर येथील वैभव डेअरीच्या दूध उत्पादक गौरव समारंभात पंजाबराव डख बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सरपंच बबनराव भुजबळ होते.

या वेळी डेअरीच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन शांताबाई व जेष्ठ नेते गंगारामभाऊ रोहोकले व सौ कमलताई व प्रभाकर रोहोकले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संभाजीराव रोहोकले,डी एन थोरात,उद्योजक मधुकर रोहोकले,गंगाधर रोहोकले,बाबूशेठ रोहोकले,लक्ष्मण चेमटे,डी.के. रोहोकले,अनिल डेरे,सूर्यकांत मांडगे,गौरव मांडगे,ठकचंद रोहोकले,संदीप ठुबे,यादवराव वाळुंज,पंढरीनाथ शेळके, अरुण चौधरी,संभाजी आमले,कौसर पठाण,संदीप भागवत,अविनाश राऊत, सोपानराव लोंढे,सौ मंदा रोहोकले,ज्योती ठूबे,उषा रोहोकले महिला भगिनी मोठ्या संख्येने तसेच सर्व सेंटरचालक व दुध उत्पादक मोठ्या संख्र्येनी उपस्थितीत होते.

डख यांनी हवामान बदल,पाऊस,पशू पक्ष्यांच्या हालचाली,जुन्या काळातील प्रथा या विषयी केलेल्या मार्गदर्शनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. सूत्रसंचालन संतोष रोहोकले सर प्रास्ताविक संचालक उद्योजक संदीप रोहोकले आभार मनोहर रोहोकले यांनी मानले.

---

# कनोईग ॲण्ड कायाकिंगमध्ये अश्विनी ढमढेरे यांचे प्राविण्य

चिन येथील वल्डकपमध्ये भारताला प्रथमच ब्रांझ मेडल

**कोहकडी : प्रतिनिधी**

**चिनमध्ये पार पडलेल्या कनोईग ॲड कायाकिंग या क्रिडा प्रकारात भारतीय टीमने प्रथमच यश संपादन करीत ब्रांझ मेडलची कमाई केली. भारतीय टीममध्ये राळेगण थेरपाळ येथील अश्विनी वागस्कर यांचा समावेश होता. अश्विनी यांनी या स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवत स्पर्धे वर छाप पाडली.**

कनोईग ॲण्ड कायाकिंग या खेळामध्ये आवड असलेल्या अश्विनी यांना खेळाचा सराव करण्यासाठी पंचायत समितीचे माजी सभापती सुदाम पवार यांच्या माध्यमातून खा. नीलेश लंके यांनी नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने आर्थिक मदत केली होती.

अश्विनी वागस्कर या राळेगण थेरपाळ येथील प्रगतीशिल शेतकरी बाळासाहेब ढमढेरे यांची कन्या असून त्यांचा विवाह पुण्यातील वागस्कर कुटूंबात झालेला आहे.भारतीय संघाला ब्रांझ पदकाची कमाई करून देण्यात मोलाची कामगिरी करणाऱ्या



अश्विनी वागस्कर यांचे पारनेर तालुक्यासह पुणे जिल्हयात त्यांचे कौतुक करण्यात येत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

अश्विनी यांनी चिनमध्ये झालेल्या या स्पर्धेत मिळविलेल्या यशाबददल खासदार नीलेश लंके यांनी आनंद व्यक्त केला असून अश्विनी यांनी या क्षेत्रात असेच यश संपादन करावे अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

---

# कंट्री क्रॉप्सच्या माध्यमातून लाळगे यांचे शेतकऱ्यांना पाठबळ

चेअरमन चंद्रकांत लंके यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**कंट्री क्रॉप्स माध्यमातून संकेत लाळगे व त्यांच्या सहकाऱ्यांचे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात पाठबळ मिळत असून कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मच्छिंद्रशेठ लंके यांचे पाठबळ व मार्गदर्शन सातत्याने मिळत असल्याने लाळगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी एक व्यवसायीक विश्व निर्माण केले असून आजच्या तरुणांनी व्यवसाय, उद्योग यामध्ये काय केले पाहिजे हा मंत्र मच्छिंद्रशेठ लंके यांनी खऱ्या अर्थाने दिला असून कन्हैयाने राज्याचा औद्योगिक विकास केला असल्याचे प्रतिपादन श्री पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे चेअरमन चंद्रकांत लंके यांनी व्यक्त केले आहे.**

कंट्री क्रॉप्स कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संकेत लाळगे, सहसंस्थापक विशाल जगदाळे, खरेदी विक्री विभागाचे प्रमुख ज्ञानेश्वर लंके यांनी कंट्री क्रॉप्स कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवाळीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते डॉ निवृत्ती पानमंद, चेअरमन लंके, पतसंस्थेचे उपाध्यक्ष दत्तात्रय गुंड , ग्रामपंचायत सदस्य गणेश कवाद, प्रगतीशील शेतकरी भरत ढवळे, हौशाराम शेटे, व्यापारी असोसिएशनचे सदस्य श्रीकांत लामखडे , पतसंस्थेचे संचालक भागुजी गुंड, भास्कर जगदाळे, मुंबई येथील व्यवसायिक भिवाजी गुंड यांच्या हस्ते मिठाई वाटप केले.

लंके यावेळी म्हणाले गेली पाच वर्षांपासून लाळगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा फायदा मिळण्यासाठी अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला तसेच त्यांच्या कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ देत पाठबळ देण्याचे काम केले म्हणून शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी क्रॉप्स कंपनीचे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ निवृत्ती पानमंद यावेळी म्हणाले शेतकरी हा देशाचा समृद्ध विकासाचा पाया आहे. शेतकरी जगला तरच आपण जगू ही भावना महत्वपूर्ण आहे. संकेत लाळगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेली पाच वर्षात शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. तसेच मिठाई वाटप करीत सर्वसामान्य शेतकऱ्यांना दिवाळीचा आनंद दिला आहे. यावेळी संकेत लाळगे, विशाल जगदाळे, ज्ञानेश्वर लंके यांनी कंपनीची माहिती दिली.

---

# कवाद स्कूल व किंडरगार्टनमध्ये दिवाळी उत्साहात

विद्यार्थ्यांनी लुटला मिठाईचा आनंद



**निघोज : प्रतिनिधी**

**सर्वांचा आवडता सण म्हणजे दिवाळी, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल व किंडरगार्टनमध्ये मोठ्या उत्साहात व आनंदाने साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मिठाईचा आनंद लुटला.**

या सणानिमित्त शाळेमध्ये आकाश कंदील तयार करण्याचे वर्कशॉप घेण्यात आले होते. या वर्कशॉपमध्ये शाळेतील इयत्ता नर्सरी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी मोठ्या आनंदाने सहभागी झाले होते .शाळेचे कलाशिक्षक चेतन दिवटे यांनी हा उपक्रम आयोजित केला होता .म्हणतात ना क्षण मोलाचे असे हृदयात जपावेत जसे या उक्तीप्रमाणे संपूर्ण शाळेमध्ये आनंदी आनंद दिसत होता. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारची मिठाई आणली होती. शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग या सर्वांनी मिळून दिवाळी सणाचा व मिठाईचा आनंद लुटला.या उपक्रमास शाळेचे सेक्रेटरी वसंत कवाद यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या व किंडरगार्टन च्या सर्व विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचारी वर्गांना दिवाळी सणानिमित्त बाबासाहेब कवाद ग्रामविकास सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शांताराम कळसकर ,उपाध्यक्ष प्रकाश कवाद सर, सेक्रेटरी वसंत कवाद सर, प्राचार्य सल्वादर डायस व्यवस्थापन प्रतिनिधी सौ .संगीता कवाद मॅडम, कोऑर्डिनेटर मोनिका मॅडम, श्री. बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्थेच्या न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलचे सर्व विश्वस्त व पदाधिकारी तसेच बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात, सर्व संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, वरिष्ठ अधिकारी संपतराव ठुबे, शांताराम सुरकुडे, सुनील तांबे यांनी दिवाळी या सणाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

---

# संग्रामभैय्या आगे बढो, हम तुम्हारे साथ है!

■ मार्केट यार्ड परिसरभैय्यांच्या जयजयकाराने दुमदुमला ■ आ. संग्राम जगताप यांची मार्केट यार्डमध्ये प्रचार फेरी

**नगर : प्रतिनिधी**

**संग्राम भैय्या आगे बढो, हम तुम्हारे साथ है, महायुतीचा विजय असो अशा घोषणांनी, संग्राम भैय्यांच्या जयजयकाराने बुधवारी मार्केट यार्ड परिसर दुमदुमून गेला होता. नगर शहर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या प्रचारार्थ मार्केट यार्ड परिसरात प्रचार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. पावन हनुमान मंदिरामध्ये दर्शन घेतल्यानंतर प्रचार फेरीस प्रारंभ झाला.**

विधानसभा निवडणूकीमध्ये महायुतीची उमेदवारी विद्यमान आमदार आ. संग्राम जगताप यांना निश्चित होती. त्यामुळे निवडणूकीची घोषणा झाल्यानंतर त्यांची उमेदवारीही जाहिर झाली. त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून त्यांनी प्रचारात आघाडीही घेतली आहे.



प्रचार सभेमध्ये सहभागी तरूणांमध्ये मोठया उत्साहाचे वातावरण होते. प्रचार फेरीदरम्यान करण्यात येणाऱ्या घोषणाबाजीमुळे मार्केट यार्ड परीसर दणाणून सोडला होता. आ. जगतात हे प्रत्येक दुकानदारांची भेट घेत तिसऱ्या निवडणूकीसाठी मतदान करण्याचे साकडे घालत होते. मतदारांकडूनही जगताप यांच्या आवाहनास प्रतिसाद देत शहराच्या विकासाची घोडदौड अशीच सुरू ठेवण्यासाठी आम्ही संग्राम भैय्यांच्याच पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याची ग्वाही देत होते. अनेक व्यापाऱ्यांकडून आ. जगताप यांचा सन्मानही करण्यात येत होता.

ढोल ताशांच्या गजरामध्ये प्रचार फेरी जसजशी पुढे जात होती तस तसा रॅलीत सहभागी तरूणांच्या उत्साहात भर पडत होती.ठिकठिकाणी रॅलीचे व्यापाऱ्यांकडून उस्फुर्त स्वागत करण्यात येत होते. आ. जगताप हे व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी घेत असताना मार्केट यार्डमध्ये कामानिमित्त् आलेले नागरीकही जगताप यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा देत होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com